
मनाच्या कोपऱ्यात
— काही न बोललेल्या भावनांच्या कविता —
गायत्री हरिभाऊ शिंदे

मनाच्या कोपऱ्यात

गायत्री शिंदे

ई साहित्य प्रतिष्ठान

मनाच्या कोपऱ्यात

कविता संग्रह

गायत्री शिंदे

पत्ता बकुपिंपळ गाव तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर

मोबाईल नंबर 9356900319

ई-मेल gayatri.h.shinde1004@gmail.com ई मेल-

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(नियमित विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ३० ऑक्टोबर २०२६

©esahity Pratishthan®2026

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ९५/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- कैलास विमल भाऊलाल बडगुजर
- 8888284265

- ई पुस्तक विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण ते फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनाच्या कोपऱ्यात

कवयित्री- गायत्री शिंदे
भ्रमणध्वनी: 9356900319

परिचय

गायत्री हरिभाऊ शिंदे

मी Second Year BCA ची विद्यार्थिनी आहे.

(Womens College of Home Science and BCA, Loni)

माझे छोटेसे गाव, बकुपिंपळगाव, संत ज्ञानेश्वरांच्या वास्तव्याने पावन झालेल्या नेवासा तालुक्यात आहे.

माझा वाचनप्रवास अगदी बालपणापासून सुरू झाला, असं नाही. आई-बाबा कधीतरी एखादं गोष्टीचं पुस्तक आणून द्यायचे, एवढाच पुस्तकांशी माझा परिचय होता. पण दहावीच्या सुट्ट्यांनी माझ्या आयुष्यात एक नवं वळण आणलं. या प्रवासाची खरी सुरुवात झाली ती 'मृत्युंजय' या पुस्तकापासून. ते पुस्तक वाचलं आणि नकळत मी पुस्तकांच्या प्रेमात पडले.

पुस्तकं वाचताना मी त्यात इतकी रमून जायचे, की स्वतःला एका खोलीत बंद करून घ्यायचे आणि पुस्तक पूर्ण वाचून झाल्याशिवाय बाहेर यायचेच नाही. माझं हे पुस्तकवेड पाहून घरच्यांनी पुस्तकं आणून देणं हळूहळू बंद केलं. पण वाचनाची ओढ थांबणारी नव्हती. मग सुरू झाली मोबाईलवर पुस्तकांचा

शोध घेण्याची मोहीम. वेगवेगळे ॲप्स, संकेतस्थळं शोधता शोधता एक दिवस ई-साहित्य ही वेबसाईट सापडली आणि माझ्या वाचनविश्वाला नवी दिशा मिळाली.

सुरुवातीला घरच्यांपासून लपून पुस्तकं वाचणारी मी, पुढे पुस्तकांच्या या जगात इतकी रमले की माझ्या या आवडीची घरच्यांनाही सवय झाली. एकेक पुस्तक वाचता वाचता कधी १०, कधी १०० आणि मग ४५० हून अधिक पुस्तकांचा टप्पा गाठला, हे कळलंच नाही. या प्रवासात पुस्तकांनी केवळ मनोरंजन केलं नाही, तर विचार करायला, माणसांना समजून घ्यायला आणि स्वतःच्या मनात डोकावून पाहायलाही शिकवलं.

याच वाचनातून कुठेतरी शब्दांशी मैत्री झाली. मनात उमटणारे विचार, जाणवणाऱ्या भावना आणि अनुभव हळूहळू कवितांच्या रूपाने कागदावर उतरू लागले. कधी वाचलेल्या शब्दांनी प्रेरणा दिली, तर कधी स्वतःच्या मनात दडलेल्या भावनांनी लेखणी हातात घ्यायला भाग पाडलं. वाचनाची आवड कधी लेखनाची वाट बनली, हे मलाही कळलं नाही.

याच प्रवासातून माझा पहिला कवितासंग्रह ‘मी न कळलेली’ वाचकांसमोर आला. आणि आज, त्याच शब्दप्रवासातील आणखी एक पाऊल म्हणून माझा दुसरा कवितासंग्रह ‘मनाच्या कोपऱ्यात’ आपल्या भेटीला येत आहे.

पुस्तकांच्या प्रेमातून सुरू झालेला हा प्रवास आज कवितांपर्यंत पोहोचला आहे. पुढे तो मला कुठे घेऊन जाईल, हे माहीत नाही; पण पुस्तकं, शब्द आणि लेखणी यांच्याशी जुळलेलं हे नातं असंच कायम राहावं, हीच इच्छा.

गायत्री शिंदे

माझा पहिला काव्यसंग्रह

क्लिक करताच उघडेल.



अर्पणपत्रिका

हे माझं दुसरं पुस्तकसुद्धा

मी

माझी आजी

स्व. गं.भा. लिलाबाई शिंदे

हिला अर्पण करत आहे.

अनुक्रम

1 एकटी ती

2 शिकतेय मी दुनियादारी

3 एकट मन

4 जगायला लागले

5 कोणीतरी मला माझ्यासारखे समजून घ्यावं

6 जगणं एवढं सोपं असतं?

7 प्रत्येक वेळी माझंच कस चुकतं

8 माझा हेतू कोणाला कळणार

9 हळूहळू शिकतेय मी...

10 कोडरची व्यथा

11 मी शांत आहे

12 पुस्तक

13 बदल

14 वेळ

15 एकांत

एकटी ती

एकटी ती आता एकटीच असते
सख्याची कमीही भासत नसते

पंखात उगाच बळ आणून कुठेही भरकटते

सरतेशेवटी
वादळ वारा सगळं ती सहन करते
पण तिच्या आत असणाऱ्या वादळाच काय?
जे तिला जगुही देत नाही आणी मरुही देत नाही .
रोज लढते ,झगडते तरीही चालते पुढे पुढे
न थांबता न थकता
अंत काय हेही माहित नसताना.
एकटी ती
आता एकटीच जगते कुणाच्याही आधाराशिवाय

शिकतेय मी दुनियादारी

एका बाजूने विचार करणं सोडलंय मी
आपण जेवढे चांगलं तेवढाच समोरचा चांगला
अशी समजूत पुसली मी
खरं खोटं कळायला लागलंय मला
कधी चुकते धडपडते पण ठीक आहे
समजायला थोडा वेळ लागतोय पण
हळूहळू शिकतेय मी
शिकतेय मी वागणं बोलणं
शिकतेय मी दुनियादारी
समजून घेतेय मी एका एका सेकेंडला बदलेली मानस .
कधी कधी भीती वाटते
हरवून तर नाही जाणार ना मी
या सगळ्या खोट्या जगात
क्षणांत आजीचा चेहरा समोर येतो
आणि मनात विचार येतो
नाही अजूनही जगात चांगले लोक आणि
चांगले संस्कार जिवंत आहेत .

एकटं मन

लोकांमध्ये राहूनही कधी,
मन खूप एकटं असत,
बोलायला शब्द असतात खूप,
पण ऐकणारं कुणीच नसतं.

हसताना चेहरा आपला,
सगळ्यांना खरा वाटतो,
पण मनाच्या आतला आवाज
फक्त आपल्यालाच ऐकू येतो.

एकटेपण वाईट नसतं नेहमी,
कधी ते स्वतःला भेटवतं असत,
आपण खरंच कोण आहोत ,
हे हळूहळू समजवतं असत.

जगायला लागले

जगायला लागले शिकायला लागले,
माणसं ओळखायला लागले,
खरं खोटं कळायला लागले.
मुखवट्यामागचे चेहरे आता स्पष्ट दिसतात,
जे सोबत नसूनही असल्याचं नाटक करतात.
कोणावर किती विश्वास ठेवायचा हे उमजलंय,
आयुष्याचं गणित मला आता थोडंफार समजलंय.
आता कोणाच्या बदलण्याने मन दुखावत नाही,
अपेक्षांचं ओझं मी उगीच वाहत नाही.
स्वतःच्याच नजरेत आता उभी राहिले मी,
मी शांतपणे जगण्याचे नवे दिवस पाहिले

कोणीतरी मला माझ्यासारखं समजावून घ्यावं

मनाच्या या कोपऱ्यात एक अपेक्षा नेहमीच राहते,
कोणीतरी मला माझ्यासारखं समजावून घ्यावं,
असं वाटत राहते.
पण का माहीत नाही,
प्रत्येक वेळी ही आशा अपूर्णच उरते,
मी जगाला वाचू पाहते,
पण माझीच पाने अनोळखी ठरतात...
शब्द माझे साधेच असतात,
फार काही कठीण नसतात
तरीही लोकांना त्यांचे अर्थ का उमजत नसतात?
आता स्वतःलाच मी हळूच समजावून सांगते,
कदाचित माझ्या मनाची भाषा,
या जगाला अजून कळायची

जगणं एवढं सोपं असतं?

काहीतरी सुचतंय म्हणून लिहायचं,
आलो जन्माला म्हणून जगायचं.
काहीतरी कमी पडेल आयुष्यात,
म्हणून रात्री-अपरात्री लढायचं.
हाती काहीच नाही आलं तर मरायचं?
खरंच... एवढं सोपं असतं का जगायचं?
पण थांब,
मनाला एकदा विचारून बघ,
हार-जितीच्या पलीकडेही असतं एक जग.
श्वास घेतलाय तर संघर्षाला घाबरायचं कशाला?
अपेक्षांच्या ओझ्याखाली स्वतःला दाबायचं कशाला?
काहीतरी कमी पडलं तर पुन्हा उभा राहीन,
या आयुष्याला मी नव्या नजरेने पाहीन.
हात रिकामे असले तरी आभाळ कवेत घेईन,
माझ्या जगण्याला मी स्वतःच नवा अर्थ देईन.
मरणं सोपं असतं,

पण लढण्यात खरी मजा आहे,
स्वतःला संपवणं ही तर स्वतःलाच दिलेली सजा आहे.
आता रडायचं नाही,
तर ताठ मानेने जगायचं,
हाती काही नसलं,
तरी पुन्हा शून्यातून उभं राहायचं!

प्रत्येक वेळी माझंच कसं चुकतं

प्रत्येक वेळी माझंच कसं चुकतं,
आणि काय चुकलं हेही कळत नाही...
मनाच्या कोपऱ्यात साचलेलं दुःख,
डोळ्यातूनही का वाहून जात नाही?

मी माझे प्रामाणिक शब्द मांडत राहिले,
पण जगाला त्यांचा अर्थच गवसला नाही.
समोरच्याला समजून घेण्याच्या नादात,
माझाच चेहरा मला आरशात सापडला नाही...

चुका शोधणाऱ्या या गर्दीत आता,
माझं मौनच मला जास्त जवळचं वाटतं.
कारण कितीही स्पष्टीकरण दिलं तरी,
शेवटी सगळं माझ्याच पदरात येऊन पडतं...

चुकतेय मी की हे जगच वेगळे आहे,
हा प्रश्न आता मी स्वतःलाच विचारत नाही...
कारण जितके निस्तरावे मी हे नात्यांचे बंध,
तितके ते जास्त गुंतागुंतीचे होत जातात,
संपत नाही...

शेवटी तक्रार तरी मी कोणाकडे आणि काय करू?
जेव्हा माझ्याच शब्दांचे अर्थ इथे बदलले जातात.
आता थांबवून घेतलाय मी माझा हा सुसंवाद,
कारण कधी कधी सुटलेले प्रश्न,
मौनानेच सोडवले जातात

माझा हेतू कोणाला कळणार?

स्वभाव माझा स्पष्ट आहे,
जीभ जराशी भांडते,
पण कोणाला ठाऊक,
माझ्या मनात फक्त
त्यांचीच काळजी सांडते.

कधी हसवायला मस्करी करते,
कधी हक्काने रागवून जाते,
पण माझ्याच शब्दांचे फासे उलटून,
मी स्वतःच गुन्हेगार ठरून जाते.
कसा लावतात लोक अंदाज,
माझ्या मनात तर काहीच नसतं,
पण जग मलाच 'व्हिलन' समजतं,
तेव्हा मनाला खूप लागून जातं.

चूक नसतानाही अचानक सगळे,
माझ्याशी बोलणे बंद करतात,
मला एकाकी पाडून स्वतः मात्र,
माझ्याच नावाचा पाढा वाचतात.

नाही समजत मला माझे काय चुकते,
मी तर फक्त प्रेम करायला गेले,
पण पाठीवर माझ्याच वार करून,
त्यांनी मलाच परके केले.

कधी शांत बसून रडते एकटी,
जेव्हा जग माझ्यावर हसतं,
देवा, एकदा तरी सांग मला,
"प्रत्येक वेळी माझंच का चुकतं?

हळूहळू शिकतेय मी...

हळूहळू शिकतेय मी आता
एकटं राहायला,
कोणाच्याही आधाराशिवाय स्वतःला सावरायला.
गर्दीतही स्वतःला शोधणं आता जमतंय,
मन माझं माझ्याच सोबतीने आता रमतंय.

अपेक्षांची ओझी फेकून दिलीत मी दूर,
नाराजीचा आता उरला नाही तो जुना सूर.
हळूहळू शिकतेय मी आता एकटं राहायला...
कधीकधी शांततेशीही गप्पा मारून घेते,
माझ्याच डोळ्यांतील अश्रू मीच पुसून घेते.

कोणी नाही सोबत म्हणून आता वाईट वाटत नाही

कोडरची व्यथा

रात्र सरली पहाट झाली
तरी error काही जाईना
हा सेमिकोलन कुठे राहिला
या डोळ्यांना दिसेना
Logic लावले भारी जसा मीच मोठा शहाणा
Compiler म्हणतो तुझा कोड म्हणजे कचरा जमाना

Variable ची नावे ठेवली a ,b,c
दोन तासांनी मलाच कळेना यातलं data कशाचे?
शेवटी program झाला run आनंद झाला मोठा
नंतर कळलं input च दिला खोटा
अशी ही कोडीगची वारी
ज्याला जमेल तोच खरा बाहुबली भारी

मी शांत आहे

मी फार बोलत नाही,
म्हणून मला कमी समजू नको.
माझ्या शांत डोळ्यांतही,
खूप गोष्टी दडलेल्या असतात.
गर्दीत उभं राहूनही,
मला एकटं राहणं आवडतं.
कारण माझं छोटंसं जग,
माझ्या मनातच फुलत असतं.
मित्र कमी असले तरी,
ते मनापासून जपलेले असतात.
शब्द कमी पडले तरी,
भावना मात्र खऱ्या असतात.
मी शांत आहे,
पण रिकामी नाही,
माझ्या मनात एक सुंदर दुनिया आहे.
जिथे स्वप्नं, आठवणी आणि प्रेम,
हळूच रोज फुलतं

पुस्तकं

पुस्तकं उघडली की
फक्त धडे दिसत नाहीत,
त्यांच्या प्रत्येक पानामागे
एक भविष्य लपलेलं असतं.

कधी अभ्यासाचा कंटाळा येतो,
कधी परीक्षेची भीती वाटते,
कधी वाटतं
सगळं सोडून द्यावं.

पण मग
मनातलं एखादं छोटंसं स्वप्न
पुन्हा आपल्याला उठवतं.

आजच्या या रात्री,
हा अभ्यास,
ही धावपळ...

उद्या कदाचित
याच सगळ्यांची
सगळ्यात जास्त आठवण येईल.

बदल

काही माणसं बदलतात,
काही नाती बदलतात,
आणि कधी कधी
आपण स्वत:ही बदलतो.

सुरुवातीला
या बदलाची भीती वाटते.

जे कालपर्यंत आपलं होतं
ते आज परकं वाटतं,
आणि जे कधीच नकोसं वाटलं
तेच कधीतरी गरजेचं वाटतं.

पण आयुष्य कदाचित
असंच असतं.

काही गोष्टी सोडल्याशिवाय
नवीन गोष्टींसाठी
जागाच तयार होत नाही.
वेळ कुणासाठीच थांबत नाही.

कालचा दिवस
आज फक्त आठवण आहे,
आणि आजचा क्षण
उद्या कदाचित
फक्त एक गोष्ट उरेल.

वेळ

वेळ कुणासाठी थांबत नाही,
हे सगळेच म्हणतात...
पण गेलेला वेळ आठवला की,
मन मात्र तिथेच थांबतं.

कधी कधी खूप लोकांमध्ये असूनही
मनाला कुणीतरी हवं असतं...

बोलायला नाही,
फक्त शांतपणे ऐकायला.

चेहऱ्यावर हसू असतं,
ओठांवर नेहमीसारखं बोलणं असतं,
पण आत कुठेतरी
एक शांत दुःख बसलेलं असतं.

सगळे विचारतात,
“काय चाललंय?”
पण खरंच काय चाललंय
हे सांगायला शब्दच सापडत नाहीत.

मग आपण म्हणतो,
“सगळं ठीक आहे...”

आणि त्या एका वाक्यामागे
कितीतरी न बोललेले प्रश्न,
कितीतरी अपूर्ण इच्छा
आणि कितीतरी लपवलेले अश्रू असतात.

रात्री सगळे झोपल्यावर
मन मात्र जागं राहतं...

जुन्या गोष्टी आठवतं,
जुन्या माणसांना शोधतं,
आणि स्वतःलाच विचारतं—
“आपण खरंच बदललोय,
की फक्त सगळं सहन करायला शिकलोय?”

एकांत

एकांत म्हणजे आस,
एकांत म्हणजे ध्यास,
एकांत म्हणजे जिवलग मित्र खास,
एकांतनेच माणूस ओळखता येतो.
स्वतःचा स्वतःशीच संवाद घडतो,
विचारांचा नवा एक मार्ग सापडतो.
गर्दीत जे कधी ऐकू आलं नाही,
तो मनाचा आवाज एकांतात घुमतो.

हा एकांत आता मला रडवत नाही,
कोणाच्या असण्या-नसण्याने फरक पडत नाही.
माझ्याच अस्तित्वाचा मला छंद लागलाय,
माझा मलाच आता नवा रंग लाभलाय.

मी आणि तू...

मी फूल, तू सुगंध,
मी रंग, तू चित्र...

मी शब्द, तू भावना,
मी फळा, तू खडू...

मी पान, तू झाड,
मी गाडी, तू पेट्रोल...

मी पाणी, तू मासा,
मी हवा, तू श्वास...

मी पुस्तक, तर तू धडा,
मी मळा, तर तू शेत...

मी प्रश्न, तर तू उत्तर,
मी अपूर्ण, तर तू पूर्णत्व...

मी अस्तित्व, तर तू त्याचा अर्थ,
मी कविता, तर तू तिचा भावार्थ...

मी कितीही असले तरी,
माझ्या असण्याला अर्थ देणारा तू...
आणि माझ्या प्रत्येक ओळीला
पूर्ण करणारा शेवटचा शब्दही तू...! ❤️